All PDF Collection
PDF Seva

# आश्विन शुद्ध पक्षी आरती

आश्विन शुद्ध पक्षी अंबा बैसली सिंहासनी हो ।
प्रतिपदेपासून घटस्थापना ती करूनि हो ।
मूलमंत्रजप करूनी भोवतें रक्षक ठेऊनि हो ।
ब्रह्माविष्णुरुद्र आईचे पूजन करिती हो ॥१ ॥

उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो ।
उदोकारे गर्जती काय महिमा वर्णं तिचा हो ॥ धृ ॥

द्वितीयेचे दिवशी मिळती चौसष्ट योगिनि हो ।
सकळांमध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो ॥
कस्तुरीमळवट भांगी शेंदुर भरूनी हो ।
उदोकारें गर्जती सकळ चामुंडा मिळुनि हो ॥ उदो ॥ २ ॥

तृतीयेचे दिवशी अंबे श्रृंगार मांडिला हो ।
मळकट पातळ चोळी कंठी हार मुक्ताफळा हो ॥
कंठीची पदके कांसे पीतांबर पिवळा हो ।
अष्टभुजा मिरविती अंबे सुंदर दिसे लीला हो ॥ उदो ॥३॥

चतुर्थीचे दिवशी विश्वव्यापक जननी हो ।
उपासकां पाहसी अंबे प्रसन्न अंतःकरणीं हो ॥
पूर्ण कृपे पाहसी जगन्माते मनमोहिनी हो ।
भक्तांच्या माऊलि सुर ते येती लोटांगणी हो ॥ उदो ॥ ४॥

पंचमीचे दिवशीं व्रत तें उपांगललिता हो ।
अर्घ्यपाद्यपूजनें तुजला भवानी स्तविती हो ॥
रात्रीचे समयी करिती जागरण हरिकथा हो ।
आनंदें प्रेम तें आलें सद्भावें क्रीडता हो ॥ उदो ॥ ५ ॥

षष्ठीचे दिवशी भक्तां आनंद वर्तला हो ।
घेऊनि दिवट्या हस्ती हर्षे गोंधळ घातला हो ॥
कवडी एक अर्पितां देसी हार मुक्तफलांचा हो ।
जोगवा मागतां प्रसन्न झाली भक्तकुळा हो ॥ उदो ॥ ६ ॥

सप्तमीचे दिवशी सप्तश्रृंगगडावरी हो ।
तेथें तूं नांदसी भोवतें पुष्पं नानापरी हो ॥
जाईजुईशेवंती पूजा रेखियली बरवी हो ।
भक्तसंकटी पडतां झेलूनि घेसी वरचे वरी हो ॥उदो ॥ ७॥

अष्टमीचे दिवशी अष्टभुजां नारायणी हो ।
सह्याद्रीपर्वती पाहिली उभी जगज्जननी हो ॥
मन माझें मोहिलें शरण आलों तुजलागुनी हो ।
स्तनपान देऊनि सुखी केली अंतःकरणीं हो ॥ उदो ॥ ८॥

नवमीचे दिवशीं नवदिवसांचे पारणे हो ।
सप्तशतीजप होम हवनें सद्भक्ती करूनी हो ॥
षड्रस अन्न नैवेद्यासी अर्पियली भोजनी हो ।
आचार्यब्राह्मणां तृप्त केलें कृपेंकरूनी हो ॥ उदो ॥ ९ ॥

दशमीच्या दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो ।
सिंहारूढे दारुण शस्त्रे अंबे त्वां घेऊनी हो ॥
शुंभनिशुंभादिक राक्षसा किती मारिसी रणी हो ।
विप्रा रामदासा आश्रय दिधला तो चरणी हो ॥ उदो ॥१० ॥

।।जगदंबा माता की जय।।